State Board of
Higher Secondary
ne
Final Plot No. 178,179,
rti, Behind Agharkar
itute, Bhamburda,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए. फा.प्लॉ.नं.१७८.१७९.
ई बालभारती शेजारी. आघारकर
रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे. भांबुर्डा.
शिवाजीनगर. पुणे ४११००४

hairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 Fax : 25665807 &
Email : secretary.stateboard@gmail.com

क.रा.मं/परीक्षा–३/ 1962
पुणे ४११००४
दिनांक– ११/०५/२०२६

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय — जून–जुलै २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या तारखांबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) फेब्रु.–मार्च २०२६ परीक्षेचा निकाल दिनांक ०८/०५/२०२६ रोजी ऑनलाईन जाहीर झालेला असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे पुरवणी परीक्षा जून–जुलै २०२६ मध्ये घेण्यात येणार आहे. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (फेब्रु.–मार्च २०२६ परीक्षेस प्रविष्ट न झालेले), व जून–जुलै २०२६ परीक्षेसाठी नावनोंदणी केलेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे विद्यार्थी, ITI विषय घेऊन प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत. सदर परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने इयत्ता १०वी साठी www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत —

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी RTGS / NEFT द्वारे रक्कम भरावयाची तारीख | माध्यमिक शाळांनी RTGS / NEFT पावती / चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट विभागीय मंडळाकडे जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| नियमित शुल्क | मंगळवार, दिनांक १२/०५/२०२६ ते गुरुवार, दिनांक २१/०५/२०२६ | मंगळवार दि.२६/०५/२०२६ | शुक्रवार दि. २९/०५/२०२६ |
| विलंब शुल्क | शुक्रवार दिनांक २२/०५/२०२६ ते सोमवार दिनांक २५/०५/२०२६ | | |

सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन SUBMIT केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये माध्यमिक शाळांच्या लॉगिन (School Login) मधून Pre-List उपलब्ध करुन दिलेली असेल, माध्यमिक शाळांनी त्याची प्रिंट काढून विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळून ती अचूक असल्याची खात्री करावी. सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्याचप्रमाणे पडताळणी केलेबाबत मुख्याध्यापक यांनी प्रिलिस्टच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी.

इ. १० वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळेमार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्त्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे —

१ ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना फेब्रु.–मार्च २०२६ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची त्या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल.

२ श्रेणीसुधार विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अटी व शर्तीनुसार श्रेणीसुधार करु इच्छिणाऱ्या फेब्रु.–मार्च २०२६ परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी जून–जुलै २०२६,फेब्रु.–मार्च २०२७ व जून–जुलै २०२७ अशा लगतच्या तीन संधी उपलब्ध राहतील याची नोंद घ्यावी.

३ सर्व माध्यमिक शाळांनी मंडळाच्या अधिकृत Website द्वारे प्राप्त Online चलनावर नमूद केलेल्या ICICI बॅंकेच्या Virtual Account मध्ये कोणत्याही बॅंकेमधून RTGS/NEFT द्वारे चलनाप्रमाणे अचूक शुल्क रकमेचा भरणा करण्यात यावा व चलनाची प्रत व Pre-list विहित मुदतीमध्ये विभागीय मंडळास जमा करावी. रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामध्ये समाविष्ट सर्व विद्यार्थ्यांच्या **application status** मध्ये **" Draft" to "Send to Board"** व **Payment status** मध्ये **"Not Paid" to "Paid"** असा बदल आला आहे का याची खातरजमा करावी. अशा "Send to Board" व "Paid" Status प्राप्त झालेली आवेदनपत्रे मंडळास प्राप्त झाले असे गृहीत धरून त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल. व उर्वरित आवेदनपत्रे Draft Mode मध्येच राहतील व त्याबाबत कोणतीही कार्यवाही होणार नाही.

४ यापूर्वी वापरात असणाऱ्या Bank Of India/ HDFC Bank/Axis Bank च्या जुन्या चलनांचा वापर करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे मंडळात रोख स्वरूपात शुल्क स्विकारले जाणार नाही.

५ माध्यमिक शाळांना भरलेल्या आवेदनपत्रांमधून निवड करून एक किंवा एकापेक्षा अधिक चलने तयार करता येतील. परंतु शुल्काचा भरणा करताना प्रत्येक चलन स्वतंत्रपणे भरण्यात यावे. जेणेकरून त्यात समाविष्ट विद्यार्थ्यांचे Status Update होईल.

६ परीक्षा शुल्क **NEFT/ RTGS** द्वारे भरणा केल्यानंतर सदर शुल्क पुन:श्च शाळाच्या खात्यावर जमा झालेले नाही व ते मंडळाच्या खात्यावर जमा/वर्ग झालेले आहे याची खात्री करावी. **NEFT/ RTGS** परत शाळेच्या खात्यात जमा झाल्याप्रकरणी मंडळास पुन:श्च परीक्षा शुल्क भरणा ज्या दिनांकास करण्यात येईल, तो दिनांक परीक्षा फी भरणा दिनांक म्हणून ग्राह्य धरण्यात येईल, त्या दिनांकाच्या विलंब अथवा अतिविलंब शुल्कासह परीक्षा फी भरावी लागेल,याची नोंद घ्यावी.

७ माध्यमिक शाळांनी सादर केलेली सर्व आवेदनपत्रांचे विहीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबंधितांची प्रवेशपत्रे उपलब्ध करून दिली जाणार नाहीत.

८ नियमित व विलंब शुल्काने आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखांना मुदतवाढ देण्यात येणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी.

९ अतिविलंब शुल्काने आवेदनपत्रे भरण्याच्या तारखा यथावकाश कळविण्यात येतील.

उपरोक्त सर्व बाबी आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

(डॉ.दिपक माळी)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर**
**विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर - ४१३ ००५**

जा.क्र.छ.संविमं/माध्य-अ/ 597 दिनांक:14/05/२०२६

प्रती,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा
छत्रपती संभाजीनगर/बीड/जालना/परभणी/हिंगोली

उपरोक्त प्रमाणे रा.मं. पुणे यांचे पत्राची नोंद घेऊन त्या प्रमाणे कार्यवाही करावी.

प्र.विभागीय सचिव
विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर

प्रत माहितीस्तव:
१.मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४
२.मा.शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
३.शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, बीड,परभणी, जालना, हिंगोली.